नि.फौ.ख.क्र.३७१/२०२५
सरकार –वि– शेख समद
<u>निशाणी क्रमांक २५</u>

**<u>सरकार तर्फे साक्षदार क्रमांक ०६ ची साक्ष शपथेवर सुरू</u>** :–

माझे नाव :– ज्योती अशोक जैन
वय :– ६३ वर्ष, व्यवसाय :– गृहीणी,
राहणार :– शेगांव, ता.शेगांव, जि. बूलडाणा.

**<u>सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांच्यामार्फत सुरू</u>** :–

१. माझे घर तहसील ऑफीसच्या बाजुला आहे. माझे घरी मी, मुलगा, सुन व नात राहतो. आम्ही मागच्या वर्षी महाशिवरात्रीच्या दुस–या दिवशी दिनांक २४ सन २०२५ ला यात्रेसाठी गेलो होतो. त्यानंतर ५ तारखेला सकाळी ११.४५ ला आम्ही परत आलो. मी घर उघडायला गेले तेव्हा लक्षात आले की घर आतुन बंद आहे. त्यामुळे मी मागच्या दारात जावुन बघीतले असता मागच्या दाराला बाहेरुन कडी लागलेली होती. त्यानंतर घरात प्रवेश केला असता सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. त्यानंतर मी घरच्यांना आवाज दिला व पाहिले असता सर्व सामान अस्तव्यस्त पडलेले दिसले. गाद्या खाली पडलेल्या होत्या, अलमारीतील सामान खाली पडलेले होते. एका अलमारीत कपडे, सोने, नगदी ८०,०००/– रुपये होते. माझ्या सुनेची व नातीचे सोन्याची चैन, चांदीचे कमरपटटा, चाळ, सोन्याचे झुमके, सोन्याची अंगठी इत्यादी अंदाजे अडीच तीन लाखाचे सामान चोरी गेले होते. पोलीस आले होते त्यांनी माझे बयाण नोंदविले. चोरी गेलेला मुददेमाल परत मिळाला नाही. सदर मुददेमाल कोणी चोरला हे मला माहीती नाही.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री.मिरगे वकील साहेब यांचेमार्फत.</u>**

२. फिर्यादी माझा मुलगा आहे तो आज माझेसोबत आलेला आहे. हे म्हणने खरे नाही की न्यायालयात काय साक्ष द्यायची याबाबत घरी चर्चा केली. पोलीसांनी माझा जबाब दुस–या दिवशी घेतला होता. पोलीसांना जबाब देतांना मी असे सांगीतले होते की, त्यानंतर घरात प्रवेश केला असता सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. त्यानंतर मी घरच्यांना आवाज दिला. सदर बाब माझे जबाबात का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणने खरे नाही की मला फिर्यादीने जसे सांगीतले तशी मी साक्ष देत आहे. हे म्हणने खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. .

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.**

**माझे समक्ष,**

MADHURI KEWAL GOTE

Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.04.13 15:18:06 +0530

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – १३.०४.२०२६.**

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – १३.०४.२०२६**